RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६७

दि. ०२ जुलै २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना राज्यपालांचे अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी लोकभवन येथे वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

यावेळी राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे तसेच लोकभवनातील कर्मचारी व अधिकारी तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

## गावठी कट्टा व तीन जिवंत काडतुसे जप्त, एक आरोपी ताब्यात, पोलीस ठाणे विवेकानंदच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई




**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहरात बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत पोलीस ठाणे विवेकानंद चौकच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने प्रभावी कारवाई करत एका आरोपीस गावठी कट्टा व तीन जिवंत काडतुसांसह ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे संभाव्य गंभीर गुन्हा घडण्यापूर्वीच रोखण्यात पोलिसांना यश आले आहे.

दि. १ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे १.२० वाजण्याच्या सुमारास गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने गरुड चौक परिसरात, नवीन रेणापूर नाका ते गरुड चौक मार्गावरील न्यू जयनगर येथील सार्वजनिक स्वच्छतागृहासमोरील रस्त्यावर सापळा रचला. त्यावेळी १) आतुल संजय सुपले (वय २८ वर्षे, रा. सद्गुरू नगर, जुना औसा रोड, लातूर)

याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यात कोणताही वैध शस्त्र परवाना नसताना एक गावठी कट्टा व तीन जिवंत काडतुसे आढळून आली.सदर शस्त्र व काडतुसे जप्त करून आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे पोलीस अंमलदार खुर्रम काझी यांच्या फिर्यादीवरून संबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस ठाणे विवेकानंद चौक करीत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, यांच्या निर्देशान्वे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या नेतृत्वात सहाय्यक फौजदार रविंद्र गोंदकर, पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, रणवीर देशमुख, यशपाल कांबळे, योगेश गायकवाड, सचिन राठोड, सोनकांबळे यांनी बजावली आहे..

## एलपीजी दरात कपात! व्यावसायिक गॅस सिलिंडर १८३.५० रुपयांनी स्वस्त

नवी दिल्लीः जुलै महिन्याचा पहिला दिवस देशभरातील व्यापारी, हॉटेल मालक आणि केटरर्ससाठी मोठा दिलासा घेऊन आला आहे. सरकारी तेल कंपन्यांनी (ध्ृ्णे) १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत १८३.५० रुपयांची म ोठी कपात जाहीर केली आहे. मात्र, सामान्य जनतेला किंवा घरगुती ग्राहकांना कोणताही दिलासा मिळालेला नाही; १४.२ किलोच्या घरगुती स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरची किंमत पूर्वीइतकीच कायम आहे.

व्यावसायिक गॅसचे नवीन दर : या कपातीनंतर राजधानी दिल्लीमध्ये १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत ३११३.५० रुपयांवरून कमी होऊन २९३० रुपये झाली आहे. आंतरराष्ट्रीय इंधन दर आणि जागतिक एलपीजी बेंचमार्क मधील बदलांनुसार इतर प्रमुख शहरांमध्येही अशाच प्रकारे दर कमी झालेत. या निर्णयामुळे हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, ढाबे आणि लग्नाचे केटरर्स यांसारख्या सर्व आकारांच्या व्यवसायांना थेट आर्थिक दिलासा मिळेल. तसेच यामुळे बाजारातील खाद्यपदार्थ आणि पेयांच्या किमती कमी होण्याची अपेक्षा आहे. व्यावसायिक गॅस वापरणाऱ्या उद्योगांना दिलासा मिळाला असला तरी घरगुती एलपीजीचे दर मात्र स्थिर आहेत.

# ५९ जाती समूहाचा उपवर्गीकरण विरोधी ऐतिहासिक महामोर्चा मुंबई विधानभवनावर धडकला

**मुंबई / के. एच. हनवते :** आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन अनुसूचित जातीतील आरक्षण उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन सादर केले, या भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री : एकनाथ शिंदे यांनी या विषयावर सकारात्मक भूमिका व्यक्त करत सर्व समाज घटकांना विश्वासात घेऊन कोणावर ही अन्याय होणार नाही अशी ग्वाही दिली, तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री : देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीच्या प्रतिनिधीसह अनुसूचित जातीतील सर्व आमदारांची बैठक आयोजित करून उपवर्गीकरणाच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येईल असे आश्वासन दिले.

३० जुन मुंबईत इतिहासाचा दिवस आकाशात काळे ढग दाटले होते. मुसळधार पावसाने मुंबईला अक्षरशः झोडपून काढलं होतं. पण हा पाऊस जनतेच्या निर्धारापुढे फिका पडला. भर पावसातही लाखो संविधाननिष्ठ जनतेने मुंबईच्या रस्त्यांवर उतरून आरक्षण उपवर्गीकरण विरोधी ऐतिहासिक महामोर्चा यशस्वी केला. अन्यायाविरोधातील हा आवाज पावसाच्या सरींपेक्षाही प्रखर ठरला.






हा केवळ मोर्चा नव्हता तर हा संविधान, सामाजिक न्याय आणि समतेच्या रक्षणासाठी उभा राहिलेला जनसागर होता. पाऊस थांबवू शकला नाही, अडथळे रोखू शकले नाहीत, कारण हा लढा अस्तित्वाचा आणि हक्कांचा आहे. हा संघर्ष आपल्या अस्तित्वाचा आहे. हा लढा आपल्या पिढ्यांच्या भविष्याचा आहे. आणि हा लढा विजय मिळेपर्यंत थांबणार नाही..! वादळं येतीलपाऊस कोसळेल अडथळे उभे राहतील पण संविधानाच्या रक्षणासाठी निघालेली पावलं कधीच थांबणार नाहीत..!

३० जून मुंबईच्या महामोर्चाचे आपण सारे साक्षीदार आहोत – जनतेच्या निर्धारापुढे कोणतेही सत्ता मोठीं नसते, या ऐतिहासिक महामोर्चाने दाखवून दिले आहे या महामोर्चाचे नेतृत्व भारतीय बौद्ध महासभा कार्याध्यक्ष – समता सैनिक दल राष्ट्रीय अध्यक्ष : डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर, रिपब्लिकन सर सेनानी आनंदराज यशवंत आंबेडकर तसेच संविधान तज्ञ अँड. डॉ .सुरेश माने, मा. समाज कल्याण मंत्री : राजकुमार बडोले सर, जोगेंद्र कवाडे सर, डॉ. संदेश वाघ, स्मिताताई, मातंग समाजातील रुक्मिणी ताई लोंढे यांनी अगदी आपल्या पोट तिडकिने साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी सांगितलेल्या उद्गार शेर केले, ''जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव..! ज्यांनी ज्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समजून घेतले ते आज प्रगतीपथावर आहेत ज्यांनी आपल्या रूढी परंपरा अंधश्रद्धा कर्मकांड सोडले त्यांचा विकास झाला. हे मी छाती ठोक सांगते. असे उद्गार काढून उपस्थितांची मनी जिंकली. संपूर्ण महाराष्ट्रातून वंचित बहुजन समाजातील ५९ जातीतील समाज बांधव लाखोच्या संख्येने उपस्थित होता.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार

**लातूर/प्रतिनिधी:** कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांला पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही योजना जाहीर केली आहे. राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे.

या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे. अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जमुक्तीयोजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये, यासाठी राज्य शासनाने महाआयटीच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे. सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

आधार प्रमाणिकरण अनिवार्य

योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह आपले सरकार सेवा केंद्रात किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल. एकवेळ समझोता योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल. यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

## नागपूर हादरलं! २ तरुणींसह एकाला जिवंत जाळण्याचा प्रयत्न, नातेवाईक तरुण घरात घुसला अनब...

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जुन्या कौटुंबिक वादाचा राग मनात धरून एका व्यक्तीने आपल्या नातेवाईकासह घरात कामासाठी आलेल्या दोन तरुणींच्या अंगावर पेट्रोल टाकून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. सावनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही खळबळजनक घटना घडली असून, पोलिसांनी तत्परता दाखवत अवघ्या काही तासांतच आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणी धनराज देवनाथ चरवड यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी राजू लक्ष्मण बरबड या आरोपीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २९ जून रोजी दुपारी ३ ते ३.३० च्या सुमारास फिर्यादी धनराज चरवड यांचा नातेवाईक राजू लक्ष्मण बरबड हा धापेवाडा येथील त्यांच्या घरी आला. घरात प्रवेश करताच त्याने जुन्या कौटुंबिक वादाचा मुद्दा उकरून काढत वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका विकोपाला गेला की, आरोपी राजूने सोबत आणलेले पेट्रोल धनराज चरवड यांच्यासह घरात कामासाठी आलेल्या दोन तरुणींच्या अंगावर ओतले आणि त्यांना पेटवून देण्याचा प्रयत्न केला. आरोपीने पेट्रोल टाकून आग लावण्याचा प्रयत्न केला, मात्र सुदैवाने मोठा अनर्थ टळला. या जीवघेण्या हल्लयात धनराज चरवड आणि दोन्ही तरुणी किरकोळ जखमी झाल्या असून, त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

# गैरकारभार भोवला: लातूरच्या नामांकित बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या सचिव पदावरुन माधवराव पाटील टाळकीकर यांची हकालपट्टी

**लातूर/प्रतिनिधी:** शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या येथील नामांकित श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर (नोंदणी क्र. एफ-५२) मधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. संस्थेतील आर्थिक आणि प्रशासकीय गैरकारभारावर गंभीर आक्षेप आल्यानंतर, तत्कालीन सचिव माधवराव हनमंतराव पाटील टाळकीकर यांना सचिव पदावरून तडकाफडकी हटवण्यात (पदमुक्त) आले आहे. संस्था घटनेतील नियमानुसार झालेल्या या धडक कारवाईमुळे बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळातील जुना वाद पुन्हा एकदा उफाळून आला असून लातूरच्या शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.




चौकशी समितीच्या अहवालानंतर कारवाई:

मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, तत्कालीन सचिव माधवराव पाटील टाळकीकर यांच्या कार्यकाळातील कथित गैरकारभार आणि अनियमिततेविरुद्ध संस्थेच्या संचालक मंडळात तीव्र असंतोष निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर संस्थेच्या १८ सदस्यांनी एकत्र येत उपाध्यक्षांकडे रीतसर तक्रार दाखल केली होती आणि तातडीने बैठक घेण्याबाबत कायदेशीर निवेदन दिले होते. त्यानुसार संस्थेच्या उपाध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली घटनेतील तरतुदींनुसार सर्वसाधारण सभा बोलवण्यात आली. या सभेत टाळकीकर यांच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. चौकशीअंती त्यांच्यावरील आक्षेप सिद्ध झाल्याने, त्यांना तात्काळ सचिव पदावरून निष्कासित (कमी) करण्याचा ऐतिहासिक ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे संचालक मंडळातील गटबाजी आणि सत्तासंघर्ष आता उघड झाला आहे.

नव्या नेतृत्वाकडे धुरा, येरटे नवे सचिव: माधवराव पाटील यांना हटवल्यानंतर रिक्त झालेल्या सचिव पदावर संस्थेचे संचालक बस्वराज उर्फ राजू गुरपदप्पा येरटे यांची सर्वानुमते नवनियुक्त सचिव म्हणून निवड करण्यात आली आहे. उर्वरित कालावधीसाठी ते संस्थेचा कारभार पाहणार आहेत. सचिवपदी निवड झाल्यामुळे त्यांचे आधीचे संचालक पद आता कमी करण्यात आले आहे. याशिवाय, संस्थेचे दुसरे संचालक प्रभुअप्पा शिवलिंगअप्पा पटणे हे मयत झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर आणि नव्या रचनेनुसार ॲड. श्रीकांत तमणअप्पा उटगे व गंगाधर विठ्ठलराव कोदळे यांची नवनियुक्त संचालक म्हणून कायदेशीर निवड करण्यात आली आहे. संस्थेची प्रतिष्ठा जपण्यासाठी आणि पारदर्शकता आणण्यासाठी कायदेशीर चौकटीत राहून केलेली ही धडक कारवाई आणि त्यामुळे पुन्हा समोर आलेला संचालक मंडळाचा अंतर्गत वाद सध्या लातूर जिल्ह्यातील शैक्षणिक आणि सामाजिक वर्तुळात कमालीचा चर्चेचा विषय ठरला आहे.

संस्थेच्या घटनेला आणि कायद्याच्या चौकटीला धरून झालेल्या या सर्व निर्णयांची अधिकृत नोंद घेण्यासाठी सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम अनुसूची ३ नियम १३ (१) अन्वये रीतसर कायदेशीर फ ेरफार अहवाल तयार करण्यात आला. हा फेरफार अर्ज, प्रतिज्ञापत्र आणि संमतीपत्रासह सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय (धर्मादाय आयुक्त विभाग), लातूर यांच्याकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला असून, त्यावर सक्षम प्राधिकाऱ्यांची स्वाक्षरी झाली आहे. या संपूर्ण कायदेशीर कारवाईमुळे आणि नव्या नियुक्त्यांमुळे बसवेश्वर शिक्षण संस्थेतील घडामोडी आगामी काळात लातूरच्या शैक्षणिक वर्तुळात काय वळण घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

E-mail : dainikmhavratt@gmail.com

दैनिक **महावृत्त**

लातूर

गुरुवार दि. ०२ जुलै २०२६

02

## संपादकीय...

### विद्यार्थ्यांच्या शॉर्टकट शोधण्याच्या मानसिकतेबाबतही प्रबोधन झाले पाहिजे

शिक्षण हा राष्ट्राच्या विकासाचा पाया असूनही शिक्षण प्रणाली आणि शिक्षण व्यवस्था या दोहोंबाबतची स्थिती किती खालावली आहे, हे पेपरफुटीच्या एकामागून एक घडणाऱ्या घटनांनी लख्ख प्रकाशात आणले आहे. नीट, सीबीएसई, एसएससी आणि सीयूईटी-यूजी या सर्वच परीक्षा वेगवेगळ्या कारणांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडल्या. पेपर लीक झाले, तांत्रिक त्रुटींमुळे परीक्षा पुन्हा घेण्याची नामुष्की ओढवली. पेपरफुटी नावाच्या भस्मासुराने भारतीय शिक्षण व्यवस्था, तपास यंत्रणा, पोलिस प्रशासन यांसह सरकारपुढे मोठे आव्हान उभे केले आहे. कायद्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असणाऱ्या प्रशासनाची ही सपशेल हार आहे. 'नीट'ची पुनर्परीक्षाही नीट पार पडलेली नसताना आता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून रविवार, २८ जून रोजी नियोजित असलेली 'महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा'(महाटीईटी) पेपरफुटीमुळे रद्द करण्याची नामुष्की ओढवावी, हे चिंताजनक आहे. राज्यातील सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांना या पेपरफुटीचा थेट फटका बसला. सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट २०२८ पर्यंत टीईटी उत्तीर्ण होण्याची मुदत दिली आहे. राज्यात यंदा 'पेपर-१'साठी २ लाख ५८ हजार ६१, तर 'पेपर-२'साठी ३ लाख ४२ हजार ६४ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. परीक्षा देणाऱ्या सहा लाख परीक्षार्थींमध्ये कार्यरत शिक्षकांची संख्या सुमारे तीन लाखांवर आहे. टीईटी उत्तीर्ण झाली नाही, तर दोन वर्षांनी शिक्षकांना नोकरी गमवावी लागणार आहे. त्यामुळे या शिक्षकांनी जनगणनेच्या कामातून वेळ काढत परीक्षेच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केले होते. सुरुवातीला परीक्षा २१ जून रोजी होणार होती; परंतु 'नीट' परीक्षेमुळे तारीख पुढे ढकलली. अनेक शिक्षकांनी अभ्यासासाठी उन्हाळी सुट्ट्या असूनही पर्यटनाला जाणे टाळले. काहींनी दररोज १० ते १२ तास अभ्यास करून तयारी केली; पण परीक्षा काही तासांवर आलेली असताना हा प्रकार समोर आल्याने सर्वांनाच धक्का बसला. शिक्षक पात्रता परीक्षेत गैरप्रकार घडण्याचे हे पहिलेच वर्ष नाही. २०१९ मध्ये या परीक्षेतील गैरव्यवहाराचा तपास पुढे जाऊन राज्यातील सर्वात मोठ्या परीक्षा घोटाळ्यांपैकी एक म्हणून समोर आला. २०२१ मध्ये शेकडो उमेदवारांना पैशांच्या मोबदल्यात गुण वाढवून उत्तीर्ण केल्याचे आरोप झाले. तपासात शिक्षण विभागातील काही अधिकारी, मध्यस्थ, खासगी एजंट आणि तंत्रज्ञानाशी संबंधित व्यक्तींचा सहभाग असल्याचे समोर आले. अनेकांना अटक झाली आणि काही अधिकाऱ्यांवर कारवाईही झाली. त्यानंतर सरकारने सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्याचे आश्र्वासन दिले. प्रश्र्नपत्रिकांची सुरक्षा, डिजिटल नियंत्रण, परीक्षा केंद्रांवरील देखरेख आणि उत्तरपत्रिका प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविण्याच्या उपाययोजनाही जाहीर केल्या; पण यंदाच्या प्रकरणामुळे त्या सुधारणांच्या परिणामकारकतेवर प्रश्र्नचिन्ह निर्माण झाले. उत्तर प्रदेशात टीईटी परीक्षेचा पेपर व्हॉटस्पवर लीक झाला होता. त्यामुळे परीक्षा रद्द करावी लागली होती. याप्रकरणी अनेक आरोपींना अटक झाली आणि तपास विशेष कृती दलाकडे सोपवण्यात आला. राजस्थानमधील शिक्षक भरतीसाठी घेतली जाणारी 'रीट' परीक्षादेखील पेपरफुटीमुळे गाजली. यात परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांचा आणि मोठ्या टोळ्यांचा सहभाग होता. या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहेच, शिवाय आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची प्रतिमा बाधित होते. 'नीट' आणि टीईटीमधील पेपरफुटीचे प्रकरण एकसारखेच आहे. परीक्षा होण्याच्या अवघ्या काही तास आधी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी पोलिसांनी सापळा रचून आंतरराज्य टोळीतील तीन जणांना रंगेहाथ अटक केली. जप्त केलेल्या प्रश्र्नपत्रिका मूळ प्रश्र्नपत्रिकेशी जुळत असल्याचे शिक्षण परिषदेच्या अधिकाऱ्यांनी पडताळणीअंती स्पष्ट केले. ही प्रश्र्नपत्रिका तब्बल दीड कोटी रुपयांना विकण्याचा पेपरमाफियांचा कट होता. या प्रकरणाचा सूत्रधार विजेंद्र गुप्ता नामक व्यक्ती आहे. बिहारच्या समस्तीपूरचा रहिवासी असलेला विजेंद्र यापूर्वीही अनेक पेपर लीक रॅकेटमध्ये सामील होता. असे असूनही त्याला रोखण्यात यंत्रणा अपयशी का ठरल्या? २०२४ मध्ये एका 'स्टिंग ऑपरेशन'मध्ये त्याने या काळ्या धंद्यातील मोठ्या संपर्कांचे खुलासे केले होते. त्यासंदर्भात पुढे काय कारवाई झाली? वारंवार परीक्षा पुढे ढकलल्या जाणे किंवा रद्द होणे यामुळे गुणवत्तेवर आधारित स्पर्धेवरील विश्र्वास कमी होतो. एसआयटी स्थापना, अटक आणि चौकशी ही पुरेशी प्रतिक्रिया ठरू शकत नाही. दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यकच आहे. प्रश्र्नपत्रिकांच्या छपाईपासून वितरणापर्यंतची संपूर्ण साखळी नव्याने उभारणे, डिजिटल ट्रॅकिंग, संवेदनशील पदांवरील कर्मचाऱ्यांचे नियमित ऑडिट आणि पेपरफुटीला संघटित आर्थिक गुन्ह्याच्या स्वरूपात हाताळणे गरजेचे आहे. जगातील अनेक देशांनी पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायद्यांबरोबरच तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि बहुस्तरीय सुरक्षा यांचा एकत्रित वापर करून मजबूत परीक्षा प्रणाली उभी केली आहे. अनेक देशांमध्ये परीक्षा सुरक्षेला राष्ट्रीय सुरक्षेइतकेच महत्त्व दिले जाते. परीक्षेसाठी अनेक प्रश्र्नपत्रिका तयार केल्या जातात. परीक्षा सुरू होण्याच्या काही मिनिटे आधी कोणता संच वापरायचा, हे ठरवले जाते. त्यामुळे एखादा संच फुटला, तरी दुसरा संच वापरून परीक्षा सुरळीत घेणे शक्य होते. काही देशांमध्ये प्रश्र्नपत्रिका डिजिटल स्वरूपात पाठवल्या जातात. त्या पूर्णपणे एनक्रिप्टेड असतात. परीक्षा केंद्रांना त्या आधीच मिळतात; पण त्यांचे संकेतशब्द परीक्षा सुरू होण्याच्या काही मिनिटांपूर्वीच उपलब्ध करून दिले जातात. त्यामुळे पेपर फुटण्याचा धोका संपुष्टात येतो. पेपर फुटीनंतर चौकशी समित्या स्थापन करण्यापेक्षा प्रश्र्नपत्रिका तयार करण्यापासून ते परीक्षा संपेपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचे तांत्रिक आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. विशेषतः टीईटी, नीट, जेईई, भरती परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांसाठी बहुस्तरीय सुरक्षा प्रणाली, डिजिटल एन्क्रिप्शन, प्रश्र्न बँक पद्धती आणि कठोर दंडात्मक कायदे यांचा अवलंब केल्याशिवाय पेपरफुटीच्या दुष्टचक्रातून बाहेर पडणे कठीण दिसते. हे करताना विद्यार्थ्यांच्या शॉर्टकट शोधण्याच्या मानसिकतेबाबतही प्रबोधन झाले पाहिजे. व्यवस्थेत असलेले झारीतील शुक्राचार्यही उखळ पांढरे करून घेत असण्याची शक्यता दिसते. 'नीट'च्या पेपरमाफियांचे बिंग फोडले, तशाच प्रकारे टीईटी पेपरफुटीतील सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजेत. परीक्षांबाबत निर्माण झालेली विश्र्वासतूट शिक्षण क्षेत्राच्या आणि देशाच्या भविष्यासाठी धोक्याची आहे. २००२ ते २०२६ या २४ वर्षांत देशात तब्बल ४६ मोठे पेपर लीकचे घोटाळे झाले. सरकारने आता 'पेपरफुटीमुक्त भारत' अभियान हाती घेऊन ते यशस्वीपणे राबवणे गरजेचे आहे.

# नैसर्गिक व तंत्रज्ञानाधारित शेतीत महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करेल- राज्यपाल जिष्णु देव वर्मा

## राज्यस्तरीय कृषी पुरस्कार २०२३-२४ चे वितरण; डॉ.संजय ज्ञानदेव पाटील व यज्ञेश वसंत सावे डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्काराचे मानकरी



**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत वसंतराव नाईक यांनी शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी दूरदृष्टीने अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. सत्तरच्या दशकात महाराष्ट्र भीषण दुष्काळाचा सामना करत असताना त्यांनी कृषी क्षेत्राला नवी दिशा दिली. राज्यात कृषी विद्यापीठांच्या स्थापनेत त्यांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे कृषी विभागातर्फे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै या कृषि दिनानिमित्त आयोजित कृषि पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.

कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे,जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री अ‍ॅड.आशिष जयस्वाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, आयुक्त सुरज मांढरे यासह राज्यातील कृषि पुरस्कार विजेते उपस्थित होते.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार २०२३ कोल्हापुर विभाग मधून मु.पो.तळसंदे, ता.हातकणंगले, येथील डॉ.संजय ज्ञानदेव पाटील यांना तर २०२४ चा ठाणे विभागातून जि.पालघर, ता. तलासरी, मु.पो.ब्राम्हणगाव (झाई बोरीगाव) येथील यज्ञेश वसंत सावे यांना तीन लाखांचे पारितोषिक व सन्मानपत्र वितरण करण्यात आले. कृषि विभागात प्रातिनिधीक स्वरूपात लॅपटॉपचे वितरण करण्यात आले.

कृषी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची आणि अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी राज्यपाल वर्मा म्हणाले की, भारताची संस्कृती, परंपरा आणि समृद्धीचा पाया शेतकरी आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनेकदा शेतकऱ्यांचे कल्याण ही केंद्र सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, पीक विमा योजना आणि किसान क्रेडिट कार्ड यांसारख्या योजनांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा मिळत असून पशुपालक आणि मत्स्यव्यवसायिकांनाही कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध होत आहे.'बीज ते बाजार' ही संकल्पना शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ आणि योग्य भाव मिळवून देण्यासाठी प्रभावी ठरत आहे.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले की, ड्रोन तंत्रज्ञान, मृदा आरोग्य पत्रिका आणि नैसर्गिक खतांचा वापर यासारख्या उपक्रमांमुळे कृषी उत्पादकतेत वाढ होत आहे. राज्य शासनाने शेती अधिक शाश्र्वत, तंत्रज्ञानाधारित, हवामान अनुकूल आणि बाजारपेठाभिमुख करण्यासाठी अनेक परिवर्तनशील उपक्रम हाती घेतले आहेत. मुख्यमंत्री शाश्र्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत शेततळी, शेततळ्यांचे अस्तरीकरण आणि विविध जलसाठा संरचनांची मोठ्या प्रमाणावर उभारणी करण्यात आली आहे. हजारो शेततळी पूर्ण झाली असून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट आर्थिक सहाय्य जमा करण्यात आले आहे. या उपक्रमांमुळे हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देणे आणि शाश्र्वत शेतीला चालना देणे शक्य झाले आहे. महाराष्ट्र नैसर्गिक शेतीच्या क्षेत्रात देशासाठी आदर्श ठरू शकतो. नैसर्गिक शेतीमुळे पर्यावरणाचे संरक्षण होईल, तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि समृद्धीही वाढेल. यासोबतच देशी गोवंशाचे संवर्धन आणि संरक्षण यावरही विशेष भर देण्याची गरज आहे. गोआधारित जैविक घटक नैसर्गिक शेतीचा महत्त्वाचा आधार असल्याचे राज्यपाल वर्मा यांनी सांगितले.

पुढील पिढीला दुष्काळाची झळ बसू देणार नाही – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील शेती अधिक सक्षम, शाश्र्वत आणि फायदेशीर करण्यासाठी जलसंधारण, सौर कृषी पंप, दिवसा मोफत वीज, कृषी यांत्रिकीकरण, प्रमाणित बियाणे, सिंचन सुविधा आणि शेतकऱ्यांना आर्थिक आधार अशा विविध योजनांद्वारे राज्य शासन सातत्याने काम करत असून, महाराष्ट्राच्या पुढील पिढीला दुष्काळाची झळ बसू देणार नाही. राज्यात जलयुक्त शिवार अभियान आणि शेततळे योजनेच्या माध्यमातून २२ हजारांहून अधिक गावांमध्ये जलसंधारणाची व्यापक कामे करण्यात आली आहेत. या कामांमुळे अनेक भागांमध्ये एक पिकावरून दोन आणि तीन पिकांची शेती शक्य झाली असून, ज्या भागात शेती करणे कठीण होते, त्या ठिकाणीही फळबागा फुलू लागल्या आहेत. हवामान बदलाच्या आव्हानांवर मात करण्यासाठी जलसंधारण हा प्रभावी उपाय ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय प्रभावीपणे राबविण्यात येत असून, सौर कृषी पंपांच्या स्थापनेत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. प्रधानमंत्री योजनेअंतर्गत देशभरात बसविण्यात आलेल्या सौर कृषी पंपांपैकी ६० टक्के पंप महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. सध्या ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होत असून, चालू वर्षाअखेर राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांना मोफत वीज पुरविण्यासाठी राज्य शासन दरवर्षी २८ हजार कोटी रुपये खर्च करत आहे. कृषी यांत्रिकीकरणासाठी दरवर्षी १,५०० ते २,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत असून, विविध कृषी अवजारांवर ८० ते १०० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आता राज्यात प्रमाणित बियाणेच विक्रीस उपलब्ध राहतील. सर्व बियाण्यांचे ऑनलाईन प्रमाणन बंधनकारक करण्यात आले असून, प्रमाणित नसलेले बियाणे विक्रीस परवानगी दिली जाणार नाही. त्यामुळे नकली बियाण्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य होईल.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील दुष्काळी भागांना दीर्घकालीन दिलासा मिळावा यासाठी फ्लड डायव्हर्जनच्या माध्यमातून अतिरिक्त पाणी पश्र्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यांपर्यंत आणि पुढे उजनीमार्गे मराठवाड्यात पोहोचविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पांमुळे भविष्यात महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. पुरस्कार विजेते शेतकरी हे कृषी विभागाचे 'ॲम्बेसेडर' असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, त्यांच्या प्रयोगशील शेतीतून आणि नवकल्पनांतून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळेल. आधुनिक शेतीचे तंत्र, नवीन वाण आणि यशस्वी प्रयोग गावागावांत पोहोचविण्याची मोठी जबाबदारी या पुरस्कार विजेत्यांवर आहे. शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी शासन विविध उपाययोजना राबवत असताना शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफीचा निर्णयही घेतला आहे. शेतीतील गुंतवणूक वाढवून शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हेच शासनाचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात कृषी पुरस्कारांनी सन्मानित शेतकऱ्यांचे अभिनंदन करतांना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीतही प्रयोगशील आणि नावीन्यपूर्ण शेती करून इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरलेले पुरस्कार विजेते शेतकरी हेच कृषी विभागाचे खरे राजदूत आहेत.

शेतकऱ्यांच्या विकासाला प्राधान्य उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या अर्थकारणाला अधिक बळकटी देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना आणि अन्य उपक्रमांमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा दिला जात आहे. महिला शेतकऱ्यांना कायदेशीर शेतकरी दर्जा देणारे विधेयक चालू अधिवेशनात मांडण्यात येणार आहे. जिजामाता कृषी भूषण पुरस्काराच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या योगदानाचा गौरव होत आहे. कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असून, अर्थसंकल्पात ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बारामती येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्राच्या माध्यमातून शेतीसाठी नाविन्यपूर्ण उपाय विकसित होत असल्याचे त्यांनी नमूद केले. हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित बियाणे आणि जलसंधारणाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. कृषी विभाग, संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे आणि शेतकरी यांच्या समन्वयातून राज्यातील शेती अधिक आधुनिक, शाश्र्वत व स्पर्धात्मक होईल, असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर महिला कृषीरत्न पुरस्कार' कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, कृषी क्षेत्रात महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी पुढील वर्षापासून 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर महिला कृषी रत्न पुरस्कार' सुरू करण्यात येणार आहे. आज शेतक-यांना मिळालेले हे पुरस्कार व सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून त्यांच्या कुटुंबाचा, गावाचा, जिल्ह्याचा आणि महाराष्ट्राच्या कृषी परंपरेचा गौरव आहे. हरित क्रांतीचे प्रणेते आणि माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली राज्यात चार कृषी विद्यापीठांची स्थापना झाली आणि कृषी विकासाला नवी दिशा मिळाली, असे नमूद केले. दिवंगत मुख्यमंत्री नाईक यांनी पाहिलेले समृद्ध महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील सदस्यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन दिलासा दिल्याचे सांगत शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत आणि पाठबळ दिल्याचे मंत्री भरणे यांनी सांगितले. कृषी क्षेत्रात माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करतांना त्यांच्या मार्गदर्शनाचा कृषी विभागाला मोठा लाभ झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

कृषी मंत्री भरणे म्हणाले, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. कृषी समृद्धी योजनेसाठी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यापैकी २ हजार कोटी रुपयांचे वितरण झाले आहे. उर्वरित ३ हजार कोटी रुपयांची तरतूद हिवाळी अधिवेशनात मंजूर करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत साडेसात अश्र्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीजबिल माफ करण्यात आले असून गेल्या दोन वर्षांत यासाठी सुमारे २९ ते ३० हजार कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. तसेच पीएम किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी महासन्मान निधीच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना आतापर्यंत ५५ हजार कोटी रुपयांहून अधिक लाभ मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

२०२३ व २०२४ साठी १८९ पुरस्कारार्थीं डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कारासाठी राज्यातून एक पुरस्कारार्थी असून रूपये तीन लाखांचे पारितोषिक व सन्मानपत्र वितरण करण्यात आले. २०२३ व २०२४ मध्ये दोन विजेते आहेत. वसंतराव नाईक कृषिभूषण ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) दोन लाख रूपये असे प्रमाणे २०२३ मध्ये ६ व २०२४ साठी ८ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. जिजामाता कृषिभूषण पुरस्कार ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) दोन लाख रूपये असे प्रमाणे २०२३ मध्ये ८ व २०२४ मध्ये ८ पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) मध्ये ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) दोन लाख रूपये असे प्रमाणे २०२३ मध्ये ७, २०२४ मध्ये ८ पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार मध्ये ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) १ लाख २० हजार रूपये असे प्रमाणे २०२३ मध्ये ७, २०२४ मध्ये ८ पुरस्कार, युवा शेतकरी मध्ये ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) १ लाख २० हजार रूपये पारितोषिक रक्कम सन २०२३ मध्ये ८, २०२४ मध्ये ८ पुरस्कार, उद्यान पंडित ८ (प्रति विभाग १ याप्रमाणे) १ लाख रूपये पारितोषिक रक्कम २०२३ मध्ये ८, २०२४ मध्ये ८ पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कारामध्ये ४० (सर्वसाधारण प्रवर्ग साठी प्रति जिल्हा १ याप्रमाणे ३४ व आदिवासी प्रवर्ग साठी प्रति विभाग १ याप्रमाणे ०६ ) ४४ हजार रूपये पारितोषिक रक्कम, २०२३ मध्ये ३६, २०२४ मध्ये ३९ पुरस्कार, सेवारत्न पुरस्कारासाठी १० (प्रति विभाग १ याप्रमाणे ८, कृषी आयुक्तालय स्तर-१ व मंत्रालय स्तर -१) २०२३ मध्ये १० २०२४ मध्ये १० पुरस्कारांचे वितरणा करण्यात आले असे एकूण २०२३ साठी ९१ व २०२४ साठी ९८ एकूण १८९ पुरस्कारार्थींना पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

# लातूर रोड ते नांदेड रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाने ५० टक्के निधी तात्काळ द्यावा

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांची विधानसभेत मागणी

**मुंबई :** मराठवाड्यातील लातूर आणि नांदेड या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या लातूररोड ते नांदेड रेल्वे मार्गाचा प्रश्न गेल्या पाच दशकांपासून प्रलंबित आहे. या रेल्वे प्रकल्पासाठी आवश्यक असलेला ५० टक्के खर्च राज्य शासनाने तात्काळ मंजूर करावा, अशी आग्रही मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रत-ोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.

पाच दशकांपासून प्रलंबित मागणी

विधानसभा सभागृहात दि. १ जुलै २६ रोजी माहिती देताना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले की, या रेल्वे मार्गाची मागणी १९७७ मध्ये तत्कालीन खासदार आदरणीय केशवरावजी धोंडगे यांनी केली होती. लातूरचे विद्यमान खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण सध्या या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत आहेत. १०४ किलोमीटर लांबीच्या या मार्गाचा फायनल लोकेशन सर्व्हे पूर्ण झाला असून, या प्रकल्पासाठी सुमारे ३ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

राज्य शासनाच्या भूमिकेकडे लक्ष

केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी स्पष्ट केल्यानुसार, केंद्र शासन या प्रकल्पाचा ५० टक्के खर्च उचलण्यास तयार आहे. मात्र, राज्य शासनाकडून अद्याप ५० टक्के आर्थिक सहभागाबाबत कोणतीही अनुकूलता दर्शवली गेलेली नाही. राज्याच्या या अनास्थेमुळे रेल्वे प्रकल्पाचे काम सुरू होऊ शकलेले नाही, असे आमदार देशमुख यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

मराठवाड्याच्या विकासासाठी प्रकल्पाची गरज

मराठवाडा हा मागास भाग असून, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि दळणवळण सुलभ होण्यासाठी हा रेल्वे मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने या रेल्वे प्रकल्पासाठी आपला ५० टक्के वाटा उचलण्याची तयारी दर्शवून निधी त्वरित उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सरकारकडे केली आहे.



## महावितरणच्या केज ग्रामीण-१ शाखेचे कनिष्ठ अभियंता म्हणून श्री.देवा पवार यांनी स्वीकारला पदभार

### नुकतेच नव्याने रुजू झालेले कनिष्ठ अभियंता यांचा स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने सत्कार संपन्न





**केज/प्रतिनिधी :** महावितरणच्या केज ग्रामीण-१ शाखेचे कनिष्ठ अभियंता म्हणून श्री.देवा पवार यांनी नुकताच पदभार स्वीकारला असून नव्याने रुजू झालेले कनिष्ठ अभियंता श्री. देवा पवार यांचा केजच्या स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने काल सत्कार करण्यात आला.

कनिष्ठ अभियंता श्री. देवा पवार हे परभणी येथील महावितरण विभागात गेल्या १५ वर्षापासून कार्यरत होते. शासन निर्णयानुसार त्यांची बदली ही परभणी येथून लातूर परिमंडळ विभागात झाली असून केज ग्रामीण-१ च्या कनिष्ठ अभियंता श्रीमती शीतल सय्यद यांच्या रिक्त झालेल्या जागेवर कनिष्ठ अभियंता म्हणून श्री. देवा पवार यांची नुकतीच नियुक्ती झाली आहे. दिनांक २२ जून २०२६ रोजी कनिष्ठ अभियंता श्री.देवा पवार यांनी केज ग्रामीण-१ च्या कनिष्ठ अभियंता पदाचा पदभार स्वीकारला आहे. त्या अनुषंगाने स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने नवनिर्वाचित कनिष्ठ अभियंता श्री.देवा पवार यांचा शाल, पुष्पगुच्छ देवून सन्मान करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विष्णू (दादा)मस्के, स्वाभिमानी पत्रकार संघाचे अध्यक्ष तात्या गवळी, स्वाभिमानी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष संजय खळगे, प्रसिद्धी प्रमुख विनोद पवार, युवा उद्योजक शुभम मोरे, उद्योजक आश्रुबा नेहरकर यांच्यासह महावितरण कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी आणि शहरातील नागरिक उपस्थित होते.

## टीईटी पेपरफुटी प्रकरणात मुख्य सूत्रधार विजेंद्र गुप्ताची पत्नी अटकेत, पेपरफुटी प्रकरणात विजेंद्रला सहकार्य केल्याचा आरोप

**ठाणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणातील फरार असलेला मुख्य सूत्रधार विजेंद्र गुप्ता याची पत्नी सुमनकुमारी गुप्ता (३५) हिला ठाणे पोलिसांच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) पाटणा येथून अटक केली आहे. सुमनकुमारी हिचा या प्रकरणात थेट सहभाग असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. फरार विजेंद्र याच्यासोबत ती मागील काही दिवसांपासून सातत्याने संपर्कात असल्याचे कॉल तपशील अहवालातून (सीडीआर) समोर आले आहे. तसेच, आर्थिक व्यवहारांमध्येही तिची भूमिका असल्याचे तपासातून निष्पन्न झाल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

मुंबई-नाशिक महामार्गालगतच्या भिवंडीतील डोंगराळ भागात कोनगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई करत छापा टाकला होता. या कारवाईत टीईटी प्रश्नपत्रिकांच्या प्रती जप्त करण्यात आल्या असून राजीव शाव, आकाश कुमार आणि धीरज सिंग या तिघांना अटक करण्यात आली होती. या आरोपींना पोलीस कोठडी सुनावल्यानंतर ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेचे सह पोलीस आयुक्त पंजाबराव उगले यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणाची व्याप्ती दिल्ली, आग्रा, बिहार आणि हरियाणापर्यंत वाढली आहे.

तपासात विजेंद्र गुप्ता हा या पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचे समोर आल्यानंतर विजेंद्र आणि त्याचा साथीदार कपिल दहिया यांचा पोलीस शोध घेतला जात आहे. विजेंद्र हा बिहारची राजधानी पाटणा येथील चंद्रशेखर पार्क परिसरातील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्याच्या शोधासाठी पोलिसांचे पथक बिहारसह इतर राज्यात रवाना करण्यात आले आहे. दरम्यान, मंगळवारी पहाटे सुमारे ६.३१ वाजण्याच्या सुमरास पोलिसांनी सुमनकुमारी हिला अटक केली. तिला भिवंडी न्यायालयात हजर करण्यात आले. सुमनकुमारी हिच्यावतीने ॲड. शैलेश गायकवाड यांनी बाजू मांडली. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सुमनकुमारी हिला ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

अटकेत असलेल्या आरोपींच्या चौकशीदरम्यान सुमनकुमारी हिचे नाव समोर आले होते. त्यानंतर पोलिसांनी तिला अटक केली. विजेंद्र फरार झाल्यानंतरही तो सुमनकुमारीच्या संपर्कात असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. पेपरफुटी प्रकरणात तिच्या बँक खात्यात काही व्यवहार झाले असून रकमेची पडताळणी केली जाणार आहे. टीईटी पेपरफुटीबद्दल तिला माहिती होती. तसेच विजेंद्रसोबत मिळून प्रश्नपत्रिका कोणाला विकण्यात आल्या, याचा तपास एसआयटीकडून केला जात आहे.

# वसंतराव नाईक हरितक्रांतीचे प्रणेते-डॉ.वसुदेव गायकवाड

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील आनंद येथील ग्रामिण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती अर्थात कृषीदिन परिसंवाद व कृषी मेळावा, शेतकरी मेळावा घेवून साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी दोन्ही संस्थेचे संस्थापक, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.

परिसंवादात माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव,ए. बी. गायकवाड, एस. के. वैरागे यांनी सहभाग घेवून मार्गदर्शन कले. त्यानंतर कृषीमेळावा/ शेतकरी मेळावा घेण्यात आला. या वेळी ज्ञानेश्वर गायकवाड, रविंद्र गायकवाड, अमोल गायकवाड, वामन गायकवाड बिरुबापू सौदागर, बन्सीनाना गायकवाड, गौरी गायकवाड, दिव्या साबळे, कल्याणी घोगले यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे हरित क्रांतीचे प्रणेते होते, त्यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात कृषीदिन शासकीय/ अशासकीय पातळीवर साजरा केला जातो. त्यांच्या कार्यकाळात संपूर्ण महाराष्ट्राच्या कृषीक्षेत्रात/ शेती आणी मातीमध्ये अनेक यशस्वी व उपयोगी असे आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रयोग केले. महाराष्ट्राच्या कृषीक्षेत्रात हरितक्रांती करून शेतीक्षेत्राची उत्पादकता वाढविली, पाटबंधारे च्या माध्यमातून धरणे, मातीबांध, मातीबंधारे, दडीबंधारे, सिमेंट बंधारे, दगडीबांध, शेतात ताली टाकून पाणी आडवा, पाणी जिरवा. माती अडवा, पाणी जिरवा यासारखी शेतीपुरक कामे करून शेतीक्षेत्रात अमुलाग्र बदल घडविले. मोठ्या प्रमाणात शेतीक्षेत्रात पाणी खेळवून शेती मोठ्या प्रमाणात शेती बागायती केली,फळबागा शेतात शेतकऱ्यांना लावायला लावून शेतात पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. नवनवीन उत्पादकता वाढावणारे बि - बियाणे, खते, किटकनाशके शेतकऱ्यांना उपलब करून देवून शेतीयेत्रात उत्पादन वाढीच्या माध्यमातून क्रांती केली.

सिंचनाच्या सुविधा शेतकऱ्यांना शेतात उपलब्ध करून दिल्या, अगदी सामुदाईक, व व्यक्तीकही विहीरी, कुपनलिका, मोटार, विज, पाईपलाईन अनुदानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्या. शेतशिवार शक्य तेवढे हिरवेगार केले, शक्य तेवढी मदत शेतक-यांना, शेतीला करून मोठ्या प्रमाणात शेत - शिवार हिरवेगार केले, डोंगरावरती झाडे/ वनराई लावून शिवार व ऊजाड डोंगरेही हिरवीगार केली. एकूणच शेतक-यांच्या जिवनात क्रांती केली. शेतीची उत्पादकताही वाढविली व शेती आणि माती, पाणी, शेतकरी, कष्टकरी यांना महत्व देवून मोठ्या प्रमाणात हरित क्रांतीची कामे केली. म्हणूनच वसंतराव नाईक हे हरितक्रांतीचे प्रणेते होते असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

दिनांक ३० जून २०२ ६ रोजी गुरु गोविंदसिंग यांची जयंती साजरी करण्यात आली. दिनांक २८ जून २०२६ रोजी रंगभरण स्पर्धा घेण्यात आली. यात प्रथम गौरी गायकवाड तर द्वितीय कृष्णराजे गायकवाड यांनी प्राविण्य मिळविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन संस्थेचे व ग्रंथालयाचे विश्वस्थ आनंद गायकवाड यांनी केले.

## डॉक्टर डे निमित्त डॉ. वर्षा राजेश दरडे यांचे पर्यावरण संवर्धनाचे आवाहन; नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप



**लातूर/प्रतिनिधी :** डॉक्टर डे निमित्त वैष्णवी हॉस्पिटल अँड इंडोस्कोपी सेंटर येथे पर्यावरण संवर्धन आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणारा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी वैष्णवी हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. वर्षा राजेश दरडे यांनी सर्व डॉक्टरांना डॉक्टर डेच्या शुभेच्छा देत नागरिकांना पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तसेच प्लास्टिकमुक्त भारताचा संदेश देण्यासाठी नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. वर्षा राजेश दरडे म्हणाल्या की, आज आरोग्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असून त्यामागे स्वच्छतेचा अभाव, पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, वाढती वृक्षतोड, रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा अतिरेकी वापर, अन्नातील रसायने तसेच जमिनीची कमी होत चाललेली सुपीकता ही प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे केवळ औषधोपचार पुरेसे नसून निरोगी पर्यावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन, केमिकलमुक्त शेती, नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि प्लास्टिकचा वापर कमी करून कापडी पिशव्यांचा स्वीकार करणे, हेच निरोगी समाज घडविण्याचे प्रभावी उपाय आहेत. आपल्या देशासाठी, समाजासाठी आणि येणाऱ्या पिढीच्या सुरक्षित भविष्यासाठी प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. वर्षा राजेश दरडे यांनी सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या ''आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी'' या जनजागृती अभियानाचे विशेष कौतुक केले. या अभियानाच्या माध्यमातून राबविण्यात येणारे प्लास्टिकमुक्त भारत अभियान तसेच नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप हा अत्यंत स्तुत्य आणि समाजहिताचा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती होऊन प्लास्टिकचा वापर कमी करण्यास निश्चितच मदत होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले आणि प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी डॉ. राजेश दरडे, सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे तसेच अनेक नागरिक उपस्थित होते.

## आजपासून वारकऱ्यांच्या चरण सेवेला प्रारंभ

### भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ! मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा उपक्रम

**मुंबई/प्रतिनिधी :** आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा आणि चरणसेवेचा लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील चरणसेवा उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे.

राज्यातील ११ जिल्ह्यांतील पालखी मार्गावरील सुमारे ४०० मुक्कामस्थळी हा उपक्रम राबविण्यात येणार असून, १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज राहणार आहेत. वारकऱ्यांच्या पायांवरील ताण कमी करण्यासाठी सुमारे ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायांची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच गरजेनुसार रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे. याशिवाय, पालखी मार्गावर ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैली आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन वारकरी व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, गतवर्षी चरणसेवा उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमातून १ लाख ७५ हजारांहून अधिक वारकऱ्यांना थेट चरणसेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांपेक्षा अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला. यंदा ११ जिल्ह्यांतील सुमारे ४०० सेवा केंद्रांवर १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक कार्यरत असून, ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेल, रुग्णवाहिका सेवा आणि ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून अधिक व्यापक स्वरूपात सेवा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची या संकल्पनेवर आधारित चरणसेवा उपक्रमातून वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देण्यात आली असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख आणि पालखी मार्गावरील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## आम्हाला आत्मचिंतनाची गरज, सचिन अहिरांनी साथ सोडल्यानंतर संजय राऊतांचं मोठं विधान!

**मुंबई/प्रतिनिधी :** सहा खासदारांनी पक्षांतर केल्यानंतर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मंगळवारी आणखी एक मोठा धक्का बसला. युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांचे निकटवर्तीय व विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतर्फे विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी अर्ज भरला. यामुळे त्यांनीही ठाकरेंची साथ सोडल्याचं निश्चित झालं. सातत्याने पक्षात होणाऱ्या फुटींवरून संजय राऊत यांनी आज अत्यंत महत्त्वाचं विधान केलं आहे. आम्हाला खरंच आत्मचिंतनाची गरज आहे, असं ते खेदाने म्हणाले. संजय राऊतांनी आज नेहमीप्रमाणे माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, ''कार्यकर्त्यांच्या बळावर शिवसेना पक्ष उभा राहिला आहे. गेल्या काही काळात शिवसेना धक्काप्रुफ झाली आहे. आता अशा जाण्याचे धक्के आम्हाला बसत नाहीत आणि आम्ही बसवून घेत नाही. सचिन अहिर हे अत्यंत जवळचे सहकारी होते. सचिन अहिर हे सांगू शकत नाहीत की मला कोणी भेटत नव्हतं, ऐकत नव्हतं. कारण आदित्य आणि उद्धव ठाकरे रोज त्यांना भेटत होते. मी असं ऐकलं की त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना सांगितलं की पक्ष सोडणं ही त्यांची अपरिहार्यता आहे. पुढच्या वाटचालीसाठी, भवितव्यासाठी त्यांनी पक्ष सोडला, असं ते म्हणाले.

# २०२६ च्या भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुनर्क्षिण कार्यक्रमास प्रारंभ

### केज तालुक्यातील २ लाख १० हजार ९५६ मतदाराची माहिती होणार अद्येयावत





**केज/प्रतिनिधी :** २०२६ च्या भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुनर्क्षिण कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला असून २३४ बीएलओ हे १ महिन्यात घरोघरी जाऊन पडताळणी करणार आहेत. यामध्ये केज तालुक्यातील २ लाख १० हजार ९५६ मतदाराची माहिती यावेळी अद्यावत होणार आहे. केज येथे एसआयआर कार्यक्रमांतर्गत मतदार याद्या पुनर्क्षिण व अद्यावतीकरण कार्यक्रम सुरू झाला असून बुधवार रोजी उपविभागीय अधिकारी आंबेजोगाई, दीपक वजाळे, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी शुभम पवार, नायब तहसीलदार (महसूल-२) अशोक भंडारे आणि निवडणूक विभाग तहसील कार्यालय केजचे संगणक परिचालक मुबारक शेख यांनी बुधवार रोजी दुपारी केजच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या निवासस्थानी तर दुपारनंतर बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पवनसुत निवासस्थानी भेट घेऊन कामकाजाचा आढावा घेतला.

निवडणूक आयोगामार्फत मतदार यादीचे विशेष सखोल पुनर्क्षिण अभियान राबवले जात आहे. या अभियाना अंतर्गत केज तालुक्यातील २लाख १० हजार ९५६ मतदारांची संपूर्ण माहिती अद्यावत केली जाणार आहे. मंगळवार दिनांक ३० जुन रोजी या अद्यायनास प्रारंभ झाला असून दिनांक ३०जुलै पर्यंत २३४ बीएलओ घरोघरी जाऊन मतदारांच्या माहितीची पडताळणी करणार आहेत.

उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई, दिपक वजाळे यांच्या मार्गदर्शनाखाली व केज तहसीलचे तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी आणि नायब तहसीलदार (महसूल-२) अशोक भंडारे तसेच नायब तहसीलदार (निवडणूक) फुलचंद हांगे यांच्या नियोजनात हे अभियान युद्धपातळीवर राबवले जात आहे.

या अभियानाच्या माध्यमातून मतदार यादीतील मतदारांच्या माहिती संदर्भातील त्रुटी दूर केल्या जाणार आहेत.मृत, स्थलांतरित, अपात्र अथवा अवैध मतदारांची नावे यादीत समाविष्ट असतील तर अशा मतदारांची खात्रीशीरपणे पडताळणी करून नावे वगळण्यात येणार आहेत. येत्या काळात अत्यंत अचूक मतदार यादी तयार करण्यात येणार आहे

.बीएलओ म्हणून अधिकाधिक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्रत्येक मतदारास दोन फॉर्म दिले जात असून एका फार्ममध्ये आवश्यक माहिती भरून घेतली जात आहे. बुधवार दिनांक १ जुलै २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी, दिपक वजाळे नायब तहसीलदार महसूल-२ अशोक भंडारे आणि निवडणूक विभाग तहसील कार्यालय केजचे संगणक परिचालक श्री मुबारक शेख आदीने फुलेनगर भागात भेट देऊन बीएलओ यांच्याकडून कामाचा आढावा घेतला.

यावेळी समस्त अधिकारी,कर्मचारी यांच्या समवेत सामाजिक कार्यकर्ते हारुणभाई इनामदार, शाहरुख पटेल, श्रीमती बोठे मॅडम, ज्ञानेश्वर चौरे तसेच यादी भाग क्रमांक २८० चे बीएलओ अमोल वाघमारे यादी भाग क्रमांक २७९ चे बीएलओ संभाजी शिनगारे, यादी भाग क्रमांक २७३ चे बीएलओ प्रदीप गुळभिले यांनी केज शहराच्या प्रथम नागरिक तथा नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या निवासस्थानी भेट देऊन सदर कार्यक्रमा अंतर्गत आवश्यक एनुमेरेशन फॉर्म चा भरणा करून घेऊन केज तालुक्याचे प्रत्यक्ष डीजीटेझेशन च्या कामास सुरुवात केली.

### अचूक माहिती देऊन बीएलओंना सहकार्य करावे

मतदार यादीतील प्रत्येक नोंद अचूक आणि अद्ययावत असणे ही निपक्ष लोकशाहीची गरज आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी आपल्या भागातील बीएलओंना आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून द्यावेत. चुकीची अथवा अपूर्ण माहिती देऊ नये. पात्र मतदारांचा मतदानाचा हक्क अबाधित राहण्यासाठी नागरिकांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. सर्वांनी या विशेष सखोल पुनर्क्षिण अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा.

– उपविभागीय अधिकारी आंबेजोगाई, दीपक वजाळे

# लातूर जिल्हा परिषदेत कृषि दिन उत्साहात साजरा; प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान आणि मार्गदर्शिकेचे विमोचन

**लातूर/प्रतिनिधी :** हरितक्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ०१ जुलै २०२६ रोजी जिल्हा परिषदेचा कृषि विभाग, आत्मा प्रकल्प संचालक यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात कृषि दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

याप्रसंगी लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, कृषि, पशुसंवर्धन व दुग्ध विकास समितीच्या सभापती कविता गोरे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती शिवकन्या गोडभरले, जि.प. सदस्य माणिक गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, विभागीय कृषि सहसंचालक महेश तीर्थकर आणि जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दिलीप जाधव यांसह इतर अधिकारी, कर्मचारी व जिल्ह्यातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी दीपक सुपेकर यांनी कृषि दिनाचे महत्त्व विशद करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी तयार करण्यात आलेल्या कृषि सेवा केंद्रनिहाय खत उपलब्धता क्यूआर कोड आणि फवारणी करताना घ्यावयाची काळजी या विषयांवरील घडीपत्रिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी राज्य व जिल्हास्तरावर विविध पिकांचे सर्वाधिक उत्पादन घेणाऱ्या जिल्ह्यातील प्रगतशील शेतकऱ्यांचा शाल, आंब्याचे रोप व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तर लातूर कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ संदीप देशमुख यांनी खरीप पिकांचे योग्य व्यवस्थापन व पेरणी संदर्भात आणि कृषि महाविद्यालयाचे कृषि विद्यावेत्ता वसंत सूर्यवंशी यांनी सध्याच्या हवामानातील बदल, अल निनोचा शेतीवर होणारा प्रभाव व त्यावर करावयाच्या उपाययोजनांबाबत उपस्थित शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, सभापती कविता गोरे आणि जि.प. सदस्य माणिक गायकवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून ग्रामीण भागातील शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत शेतीविषयक माहिती, आधुनिक तंत्रज्ञान आणि हवामानाचा अंदाज पोहोचवण्याचे आवाहन करत सर्व शेतकरी बांधवांना कृषि दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मिलिंद बिडबाग यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## सरस्वती महाविद्यालयात कृषी दिनानिमित्त वृक्षारोपण



**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १ जुलै कृषी दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. कृषी क्षेत्रातील स्व .वसंतराव नाईक यांच्या मौलिक योगदानाबद्दल हा दिवस राज्यभर उत्साहात साजरा करण्यात येतो.

कृषी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाप्रसंगी प्रा.अमोल जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृक्षारोपणाचे आणि वृक्षसंगोपणाचे महत्व पटवून देताना झाडे लावा,झाडे जगवा,पर्यावरण वाचवा असा संदेश त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

याप्रसंगी सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर येथील प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग गोरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी शिंदे, डॉ.वसंत बंडे, प्रा. रवि चव्हाण, डॉ. सुदाम पवार, प्रा. अमोल जाधव,डॉ. संतोष कुलकर्णी, डॉ. राम खलंग्रे, डॉ. मोनालिसा खानोरकर, प्रा .ज्योती मामडगे, प्रा.सलील शहाजिंदे, प्रा.श्रीमंत दोरवे, प्रा.तुकाराम येमले,श्री. विठ्ठल चव्हाण, श्री. बळीराम कदम, सौ. भागीरथी लाड तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## इस्रायली सैन्य दोनदा इराणमध्ये घुसलं, गरज पडल्यास तिसऱ्यांदा, नेतान्याहू यांचा मोठा इशारा



**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिका आणि इराणमध्ये सुरू असलेला लष्करी संघर्ष अखेर शांत झाला आहे. दोन्ही देशांनी एकमेकांवरील हल्ले रोखण्यास सहमती दर्शवत शांतता करारावर काही दिवसांपूर्वीच स्वाक्षऱ्या केल्या आहेत. तसेच जागतिक व्यापारासाठी महत्त्वाच्या असलेल्या 'होर्मुझ सामुद्रधुनी' संदर्भातील वादावरही तोडगा काढण्यात आला आहे. त्यामुळे पश्चिम आशियातील परिस्थिती हळूहळू पूर्व पदावर येत असल्याचं पाहायला मिळत आहे.

अमेरिका आणि इराणमध्ये शांतता करार होण्यासाठी पाकिस्तान आणि कतारनेही महत्वाची भूमिका बजावली आहे. सध्या अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांनी लष्करी कारवायांना पूर्णविराम दिला आहे. मात्र, असं असतानाही इस्रायलकडून सातत्याने इराणला लष्करी कारवाईच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप केला जात आहे. यातच आता इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी इराणला पुन्हा एकदा लष्करी कारवाईचा इशारा दिला आहे.

'आम्ही आधी दोनदा प्रहार केला आणि गरज पडल्यास तिसऱ्यांदाही इराणवर प्रहार करू', असा मोठा इशारा इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी इराणला दिला आहे. नेतान्याहू यांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा मोठी खळबळ उडाली आहे. मात्र, नेतान्याहू यांच्या या धमक्यांमुळे अमेरिका-इराणमधील शस्त्रसंधी धोक्यात येऊ शकते का? याबाबत आता सवाल उपस्थित केले जात आहेत.

बिन्यामिन नेतान्याहू काय म्हणाले?

''मी पंतप्रधानपदी असेपर्यंत इराणला अण्वस्त्रसज्ज राष्ट्र होऊ देणार नाही. आम्ही यापूर्वी दोनदा इराणमध्ये लष्करी कारवाई केली आहे आणि इस्रायलच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाल्यास तिसऱ्यांदा कारवाई करण्यास मागेपुढे पाहणार नाही. देशाच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती प्रत्येक पावले उचलली जातील'', असं भाष्य बिन्यामिन नेतान्याहू यांनी केलं आहे.

''इराण आणि त्यांच्या प्रादेशिक मित्रपक्षांविरुद्धची इस्रायलची मोहीम अद्याप संपलेली नाही. गेल्या तीन वर्षांत महत्त्वपूर्ण लष्करी यश मिळवून देखील आमचा संपूर्ण विजयाचा प्रयत्न सुरुच आहे'', असंही नेतान्याहू यांनी म्हटलं आहे. दरम्यान, गाझा युद्धातील 'संपूर्ण विजय' मिळवण्याचं उद्दिष्ट अजूनही कायम आहे का? असा प्रश्न विचारला असता नेतान्याहू म्हणाले की, ''हे कधीच संपत नाही. इस्रायल पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली झाला आहे. आम्हाला अजूनही काम करायचं आहे. इराणच्या गटाचं जे काही उरलं आहे, त्याचा आम्ही बंदोबस्त करू.''

दरम्यान, बिन्यामिन नेतान्याहू यांनी पुन्हा एकदा हे स्पष्ट केलं की, ''जोपर्यंत इराण-समर्थित गटाकडून धोका असेल, तोपर्यंत इस्रायली सैन्य दक्षिण लेबनॉनमध्ये तैनात राहील. आमची भूमिका स्पष्ट आहे, जोपर्यंत हा धोका संपत होत नाही, तोपर्यंत आम्ही दक्षिण लेबनॉन सोडणार नाही.''

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्जांमधील त्रुटी पूर्ण करण्यासाठी ५ जुलै २०२६ पर्यंत अंतिम मुदत

**लातूर/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने अंतर्गत प्रलंबित अर्जांमधील त्रुटी दूर करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने ५ जुलै २०२६ पर्यंतची अंतिम मुदत दिली आहे. या मुदतीत त्रुटींची पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थी लाभापासून वंचित राहतील आणि त्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२०१६/प्र.क्र .२९३/शिक्षण-२ (दिनांक २६/१२/२०२६) अन्वये सुधारणा करण्यात आलेली ही योजना २०१७ पासून राबविली जात आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना व अटी-शर्ती शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सध्या महा-आयटी पोर्टलवर एकूण ४५० विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीपूर्ततेसाठी विद्यार्थी लॉगिनवर (सेंट बँक) प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. या संदर्भात समाज कल्याण कार्यालयामार्फत संबंधित विद्यार्थ्यांना वेळोवेळी दूरध्वनीवरून तसेच भ्रमणध्वनीवर संदेश पाठवून त्रुटी पूर्ण करण्याबाबत अवगत करण्यात आले आहे. ०१ जुलै २०२६ रोजी देखील विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा अंतिम संदेश पाठविण्यात आला आहे.

विद्यार्थी लॉगिनवर प्रलंबित असलेल्या अर्जांवर कार्यालयाकडून कोणतीही पुढील कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे त्रुटी वेळेत न सुधारल्यास अर्ज रद्द होऊ शकतो. परिणामी विद्यार्थ्याचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान झाल्यास समाज कल्याण कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्यामुळे सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी तात्काळ आपापल्या लॉगिनवर जाऊन आवश्यक कागदपत्रांची व त्रुटींची पूर्तता करावी आणि आपले ऑनलाईन अर्ज ०५ जुलै २०२६ पूर्वी कार्यालयाच्या लॉगिनवर सादर करावेत, असे जाहीर आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांची धडक मोहीम

### एका महिन्यात ७२१ गुन्हे दाखल, ७७८ आरोपींवर कारवाई, १ कोटी २० लाख ५३ हजार ७१२ रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** समाजातील शांतता, सुरक्षितता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा पोलीस दलाकडून सातत्याने प्रभावी व कठोर कारवाई करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेला अवैध धंद्यांविरोधात ठोस व परिणामकारक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ०१ जून २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात आली.



या मोहिमेदरम्यान शहरी तसेच ग्रामीण भागात एकाचवेळी नियोजनबद्ध पद्धतीने छापेमारी करून अवैध देशी-विदेशी दारू विक्री, जुगार, अमली पदार्थांची तस्करी, गुटखा विक्री तसेच बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात आली.

या कालावधीत एकूण ७२१ गुन्हे दाखल करून ७७८ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली असून १ कोटी २० लाख ५३ हजार ७१२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये दारूबंदी प्रकरणे- ६२२ गुन्हे, ६३० आरोपी, २६,४२,६०५ किंमतीचा मुद्देमाल जप्त.जुगार प्रकरणे- ७३ गुन्हे, १०६ आरोपी, ४०,३१,२८० किंमतीचा मुद्देमाल जप्त. गांजा प्रकरणे-३ गुन्हे, ३ आरोपी, ३,३०,५०० किंमतीचा मुद्देमाल जप्त.गुटखा प्रकरणे -१२ गुन्हे, २४ आरोपी, ४१,८१,०२७ किंमतीचा मुद्देमाल जप्त.आर्म क्ट प्रकरणे-११ गुन्हे, १५ आरोपी, ८,६८,३०० किंमतीचा मुद्देमाल असा एकूण १ कोटी २० लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे

अवैध धंद्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींवर केवळ गुन्हे दाखल करून न थांबता, त्यांच्याकडून पुन्हा अशा प्रकारचे गैरकृत्य घडू नये यासाठी संबंधितांविरुद्ध प्रतिबंधक कारवाईदेखील करण्यात आली आहे. प्रतिबंधक आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

यावेळी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी सांगितले की, लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा धडक कारवाया यापुढेही अधिक तीव्रतेने व सातत्याने सुरू राहतील. नागरिकांनी अवैध धंद्यांची माहिती पोलीस प्रशासनास देऊन सहकार्य करावे.

## पत्नीच्या त्रासाला कंटाळून पतीची आत्महत्या

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पत्नीच्या त्रासाला कंटाळून एका २७ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. वर्षभरापूर्वीच लग्नबंधनात अडकलेला अनिकेत बाळासाहेब जगताप (वय २७) याने पत्नी श्रुती धिवरेला कंटाळून आत्म हत्या केली आहे. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली असून जगताप कुटुंबियांवर आभाळ कोसळलं आहे.

नेमकं प्रकरण काय ?

नाशिकच्या मालेगाव कॅम्प भागातील साने गुरुजी नगरात अनिकेत बाळासाहेब जगताप राहत होता. अनिकेतचा वर्षभरापूर्वी मोठ्या उत्साहात पंचशील नगरातील श्रुती धिवरे या तरुणीशी विवाह झाला होता. मात्र, विवाह झाल्यापासूनच दोघांमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणातून सतत वाद होत होते. वर्षभरापूर्वीच लग्न झालेली श्रुती ही सासरी नांदायला येत नव्हती. तिने अनिकेतविरुद्ध पोलिसात तक्रार केली होती. या तक्रारीमुळे अनिकेत गेल्या काही महिन्यांपासून मानसिक तणावाखाली होता. आणि याच त्रासाला कंटाळून अखेर त्याने टोकाचे पाऊल उचलत राहत्या घरात गळफास घेतला आहे असा आरोप अनिकेतच्या कुटुंबीयांनी केला आहे.

आत्महत्येप्रकरणी गुन्हा दाखल

अनिकेतच्या आत्महत्येनंतर सुरुवातीला या घटनेची आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र अनिकेतचे वडील बाळासाहेब जगताप यांनी कॅम्प पोलिसांना दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अनिकेतचा मानसिक छळ केल्याप्रकरणी पत्नी श्रुती जगताप, सासू वंदना सुभाष धिवरे, सासरे सुभाष सुकदेव धिवरे आणि मामे सासू उज्वला सतीश पवार (सर्व रा. पंचशील नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

...तर आत्मदहन करू, जगताप कुटुंबीयांचा इशारा

दरम्यान पोलिसांनी या प्रकरणी तात्काळ कारवाई करत सासू आणि सासरे यांना अटक केली आहे तर पत्नी श्रुती आणि मामेसासू उज्वला पवार हे फरार झाले आहेत. श्रुतीला आणि मामे सासूला तत्काळ अटक करा अन्यथा आत्मदहन करू असा इशारा मयत अनिकेच्या कुटुंबीयांनी दिला आहे. दरम्यान या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक पंकज निकम करीत आहेत.

एकीकडे हुंडाबळी , आणि सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून अनेक विवाहित महिला आत्म हत्या करत आहे तर दुसरीकडे पत्नीच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करणाऱ्या पुरुषांच्या घटना देखील समोर येत आहेत. त्यामुळे याठिकाणी पुरुषांच्याही बाजू , वेदना सम जावून घेत अशा स्त्रियांवर देखील कठोर कारवाई होणे गरजेचे आहे असा सूर उमटत आहे.

## 'एसटी'च्या तीर्थाटन योजनेत खासगी भागीदारीला हिरवा कंदील!

### 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - एसटी संगे तीर्थाटन' योजनेला वेग; राज्यभर सहा प्रादेशिक पर्यटन संस्थांची होणार निवड- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या महत्त्वाकांक्षी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - एसटी संगे तीर्थाटन' योजनेला अधिक व्यापक आणि व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी खासगी पर्यटन संस्थांच्या सहभागाला तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो भाविकांना सुरक्षित, सुसूत्र, किफायतशीर आणि सर्वसमावेशक तीर्थयात्रेची सुविधा उपलब्ध होणार असून, एसटी महामंडळालाही अतिरिक्त महसुलाचा नवा स्रोत निर्माण होईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, नव्या धोरणानुसार तीर्थाटन,व धार्मिक सहलींचे नियोजन, निवास, भोजन, स्थानिक पर्यटन, मार्गदर्शक, टोल, पार्किंग, प्रवेश शुल्क आदी सर्व पूरक सुविधा खासगी पर्यटन संस्थांकडून पुरविण्यात येतील. मात्र, बस सेवा, प्रवासी वाहतूक आणि प्रवासभाड्याचे संपूर्ण उत्पन्न एसटी महामंडळाकडेच राहणार आहे. त्यामुळे भाविकांना सर्व सुविधा 'वन-स्टॉप' पद्धतीने उपलब्ध होतील आणि एसटीच्या उत्पन्नालाही चालना मिळेल. या योजनेअंतर्गत बस आरक्षणासाठी प्रत्येक बसमध्ये बसच्या आसनक्षमतेनुसार प्रवासी असणे बंधनकारक राहील. शासनाच्या विविध सामाजिक घटकांना लागू असलेल्या प्रवास सवलती या योजनेतही लागू राहतील. त्यामुळे खासगी पर्यटन संस्थांच्या तुलनेत या योजनेतील प्रवास खर्च तुलनेने कमी असेल. निवास, भोजन, पिण्याचे पाणी, चहा-नाश्ता, पर्यटनस्थळांचे प्रवेश शुल्क, मार्गदर्शक, पार्किंग, टोल आदी सुविधा वाजवी दरात आणि दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित खासगी संस्थांची राहील. तसेच या सुविधांमधून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी किमान १० टक्के हिस्सा एसटी महामंडळाला देणे त्यांच्यासाठी बंधनकारक असेल.






**मराठी तरुण-तरुणींसाठी पर्यटन क्षेत्रात सुवर्णसंधी!**

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - एसटी संगे तीर्थाटन' योजना ही राज्यातील मराठी तरुण-तरुणींसाठी रोजगार आणि उद्योजकतेचे नवे दालन खुलं करणारी योजना आहे. कोणतीही मोठी भांडवली गुंतवणूक न करता, केवळ नियोजन, व्यवस्थापन कौशल्य आणि पर्यटना विषयीची आवड यांच्या जोरावर या क्षेत्रात यशस्वी वाटचाल करता येऊ शकते. महाराष्ट्राच्या समृद्ध धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटन वारशाला चालना देतानाच स्थानिक युवक-युवतींना स्वावलंबी बनण्याची ही मोठी संधी आहे. राज्यातील अधिकाधिक मराठी तरुण-तरुणींनी या योजनेत सहभागी होऊन पर्यटन उद्योगात आपले स्थान निर्माण करावे, रोजगार निर्मितीत योगदान द्यावे आणि महाराष्ट्राच्या पर्यटन विकासाचे भागीदार व्हावे, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

**भाविकांच्या श्रद्धेला सेवाभावाची जोड आणि एसटीच्या आर्थिक बळकटीला नवा आधार' या दुहेरी उद्देशाने राबविण्यात येणारी ही योजना राज्यातील धार्मिक पर्यटनाला नवी दिशा देण्याबरोबरच एसटी महामंडळाच्या उत्पन्नवाढीसाठीही प्रभावी ठरेल!**

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निविदा प्रक्रियेद्वारे राज्यातील सहा प्रदेशांसाठी प्रत्येकी एका पर्यटन संस्थेची, अशा एकूण सहा संस्थांची निवड करण्यात येणार आहे. संबंधित संस्थांना पर्यटन क्षेत्रातील अनुभव, शासनमान्य नोंदणी तसेच आवश्यक पात्रता असणे अनिवार्य राहील. प्रारंभी हा प्रकल्प दोन वर्षे प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार असून, त्यानंतर मिळणाऱ्या प्रतिसादाच्या आधारे पुढील विस्ताराचा निर्णय घेतला जाईल.

तीर्थाटन योजनेच्या प्रसिद्धीसाठी खासगी पर्यटन संस्थांना एसटीचा अधिकृत लोगो वापरण्याची मुभा देण्यात येणार आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.